चर्मकार जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितिचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच्.डी.(Ph.D.) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड करिता सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

(Synopsis)

- : संशोधक :-

बब्रुवाहन प्रल्हाद पवार

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. पी. आर. मुट्टे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मार्च २०२२

प्रस्तावना :

भारतीय समाज जिवनात सामाजिक स्तरिकरणासाठी वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला गेला. प्राचीन काळापासून भारतात वर्णव्यवस्था अस्तीत्वात होती रूग्वेदामध्ये वर्णव्यवस्थेचे विश्लेषण आढळून येते. कालौधात वर्णव्यवस्था जी गुणक्रमावर अवलंबून होती ती संपुष्टात येवून तीची जागा जन्मानुसार वर्ण प्राप्त होण्यात झाली. उत्तर वैदिक काळात जन्मानुसार वर्णाची निश्चिती घेण्याला अधिक बळकटी प्राप्त झाली. बदलत्या सामाजिक परिस्थितीचा परिणाम वर्णव्यवस्थेवर होवून ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णाना साचेबंदपणा प्राप्त झाला यातूनच जातींचा उदय झाला जाती हा शब्द जन्म या अर्थाने येतो म्हणजे जन्माने जी निश्चित होते तीला जात म्हणतात जी व्यक्तीला कधीच बदलता येत नाही ही जात होय म्हणून तर मदन आणि मुजूमदार म्हणतात की, "जात म्हणजे साचेबंद वर्ग होय."

वर्णाचे साचेबंदीकरण आणि जातींचा उदय या घटना सर्वात परिणामकारक ठरल्या त्या शुद्रांसाठी! शुद्र मानल्या गेलेल्या वर्णाला म्हणजेच नंतरच्या काळातील जातींना सामाजिक व्यवहारापासून आणि धार्मिक अधिकारापासून दूर ठेवले गेले यातूनच या पुर्वाश्रमीच्या शुद्र जातींचे वंचीतत्व अधिकच वाढत राहिले अस्पृश्यता ही यातूनच जन्माला आली. मध्ययुगीन सामाजिक जिवनात स्पृश्य–अस्पृश्यतेला अधिकच महत्त्व दिले गेले. पारंपारिक काळापासून चालत आलेल्या चार वर्णापेक्षा पंचम वर्ण निर्माण झाला ज्यांना अतिशुद्र म्हटले गेले असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात या अतिशुद्रांमध्ये महार, मांग, चांभार, ढोर (डोहार) या चार जातींचा उल्लेख केला जातो. हा पंचम वर्ण गावकुसाबाहेर राहणारा उपेक्षित अस्पृश्य व अतिशुद्र समाज मानला गेला यामुळे महार, मांग, चांभार, ढोर (डोहार) या चार जाती भारतीय समाजातील अति मागासलेल्या जाती ठरल्या.

चांभार किंवा चर्मकार जाती किंवा समाज मृत प्राण्यांचे कातडी काढून त्यापासून सुरुवातीला कपडे नंतर पायातील वाहने बनविण्याचा व्यवसाय करणारी जात आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जिवनाच्या गावगाड्याशी संबंधित असणाऱ्या बारा बलुतेदारापैकी एक बलुतेदार म्हणून चर्मकारांचा उल्लेख केला होता इतर अस्पृश्य

जातीपेक्षा चर्मकारांना अस्पृश्यता कमी होती म्हणूनच चर्मकार स्वतःला 'दलितामधील ब्राह्मण असे संबोधत असत. चर्मकार समाज हा भारतातील सर्व भागात दिसतो काही ठिकाणी त्यांना चर्मकार, चांभार, मोची इत्यादी शब्द वापरले गेले. चर्मकार समाजाची स्वतःची एक संस्कृती आहे. हिंदू धर्माशी आपला संबंध सांगणारे स्वतः ची दैवत कल्पना व जात पंचायत असणारी आणि स्वतःचा व्यवसाय सांभाळणारी ही जात आहे. संत रोहिदारा सारखा संत चर्मकार समाजात होऊन गेला ज्याने समतावादी विचारांची मांडणी करून मानवतावाची दृष्टीकोनातून आपले चिंतन प्रकट केले. डॉ. चंद्रशेखर चांदेकर म्हणतात की, 'गुरु रोहिदास हे सामाजिक क्रांतीचे प्रणेते आहेत.' याशिवाय ककय्या, हरळय्या, घासीदास इत्यादींच्या विचारांचा प्रभाव चर्मकार जातीवर झाला आहे.

भारतीय स्वातंत्र्यानंतर चर्मकार जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केला गेला संपूर्ण भारतामध्ये अनुसूचित जातीमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने चर्मकार समाज प्रथम क्रमांकावर तर महाराष्ट्रामध्ये तृतीय क्रमांकावर आहे. संपूर्ण भारतात चर्मकार समाजाच्या अनेक उपजाती आहेत. सदरिल अध्ययनासाठी लातूर जिल्हयातील चर्मकार जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे इ.स. 2000 मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार लातूर जिल्ह्यातील चर्मकारांची लोकसंख्या 37,329 एवढी होती चर्मकार जातीच्या समाजशास्त्रीय अभ्यास करण्याची आज विशेष आवश्यकता आज यासाठी आहे की, आजही चर्मकार समाजाची पारंपारिक स्थिती फारशी बदललेली नाही. दारिद्रय, आर्थिक दुर्बलता, निरक्षरता, राजकीयदृष्टया उपेक्षितपणा आणि बेकारी या समस्यांना चर्मकार समाज आजही तोंड देत आहे. या सामाजिक समस्यांतून चर्मकार समाज कक्षा बाहेर येऊ शकेल या संबंधी समाजशास्त्रीय अभ्यास करण्याच्या आवश्यकतेतन 'चर्मकार जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

लातूर जिल्ह्यातील चर्मकार जातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करित असताना ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक आणि वैचारिक पैलूंचा अंतरविद्याशाखीय अभ्यास केला जाणार आहे. चर्मकार जातींचा समाज जिवनावर

झालेला परिणाम आरक्षणाची निती व महिलांची स्थिती यांचाही अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन विषयाची निश्चिती :

आधुनिक काळात नागरिकरण, औद्योगीकरण, आधुनिकीकरण आदि प्रक्रियांचा प्रभाव भारतातील संपूर्ण समाजव्यवस्थेवर पडलेला असल्याचे आपणास पहावयास मिळते याच प्रकियांच्या प्रभावामुळे सामाजिक संरचनेवर खूप मोठया प्रमाणात प्रभाव पडल्याचे दिसून येते. हजारों वर्षापासून आपला पारंपरिक व्यवसाय करत असलेल्या या व्यवसायिकांवरही या प्रक्रियांचा प्रभाव पडलेला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत स्पृश्य, अस्पृश्य असा भेद हजारो वर्षांपासून चालत आलेला आहे. अस्पृश्यांमध्ये प्रामुख्याने महार, मांग, चर्मकार इत्यादी जाती येतात. बारा बलुतेदारापैकी चर्मकार जात एक महत्त्वाची जात मानली जायची या चर्मकार समाजाला समाजव्यवस्थेत अगदी निम्न स्थान होते कोणत्याही प्रकारचे सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक स्वातंत्र्य दिले गेले नव्हते. अगदी अमानुष अत्याचार चर्मकार जातीवर केले जात असत. हजारो वर्षापासून आपला पारंपरिक व्यवसाय करून स्वावलंबनाने आपली उपजिवीका भागवणारा व इतरांच्या पायतनांची गरज भागविणारा चर्मकार समाज आजही उपेक्षित असल्याचे दिसून येतो. विविध प्रश्न व समस्या चर्मकार समाजाच्या आहेत. आधुनिक काळात या चर्मकार समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक स्थिती कशी आहे? हे सामाजिक दृष्टीकोनातून शोधने आवश्यक आहे. चर्मकार समाजाच्या पारंपरिक व्यवसायामध्ये कोणते बदल झाले आहेत त्याची नेमकी कारणे कोणती आहेत? याचा शोध घेण्यासाठी तसेच या समाजाचा सद्य स्थितीतील सामाजिक दर्जा शोधण्यासाठी संशोधकाने धर्मकार जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधनाचे उद्देश :

1 चर्मकार जातीच्या पारंपरिक व्यवसायिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

2 चर्मकार जातीच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे..

3 चर्मकार जातीच्या सामाजिक, महिला विषयक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

4 चर्मकार जातीच्या समस्या व शासकीय योजनांच्या लाभाचे अध्ययन करणे,

5 चर्मकार जातीचा समाजिक दर्जा आणि चर्मकार जातीवरील आधुनिकीकरणाच्या प्रभावाला अभ्यासणे .

6 चर्मकार जातीवर गुरू रविदासांच्या व इतर समाज सुधारकांच्या विचारांचा पडलेला प्रभाव व त्यातून झालेल्या परिवर्तनाचा शोध घेणे.

गृहितकृत्य :

1 चर्मकार जातीच्या पारंपारिक व्यवसायावर आधुनिकीकरणामुळे मर्यादा आल्या आहेत.

2 चर्मकार जातीत दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे. चर्मकार जातीचा सामाजिक दर्जा सुधारत आहे..

3 चर्मकार जातीमध्ये प्रभावी सामाजिक संघटन होऊ शकले नाही.

4 चर्मकार जातीत स्त्रीयांचा सामाजिक दर्जा सुधारत आहे.

5 आरक्षणाचा व शासकीय योजनांचा सकारात्मक परिणाम चर्मकार जातीवर झाला आहे.

6 चर्मकार जातीचे साचेबंदीकरण आजही दृढ आहे.

7 गुरु रविदास, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी चर्मकार जातीत शैक्षणिक प्रगती झाली आहे.

संशोधन क्षेत्र :

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने लातूर जिल्ह्याची संशोधनासाठी निवड केली आहे. त्यामुळे संशोधकाचे संशोधन कार्य हे लातूर जिल्ह्यापुरते मर्यादित असणार आहे. संशोधक लातूर जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यातील चर्मकार जातींचा समाजशास्त्रीय अभ्यास करणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात चर्मकार समाजाची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक स्थिती तसेच चर्मकार समाजातील महिलांचा दर्जा, चर्मकार समाजातील पारंपारिक व्यवसाय व बदलते स्वरूप आदि बार्बीचे लातूर जिल्ह्यातील चर्मकार जातीचे अध्ययन केले जाणार आहे.

नमुना निवड प्रणाली :

तथ्य संकलनासाठी नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये अनुसूचि व प्रश्नावली या तंत्रासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छीक नमुना निवडीचा वापर केला जाणार आहे. सदरील संशोधन हे क्षेत्रीय असल्याने ग्रीड पध्दतींचा वापर देखील करण्यात येणार आहे .

याशिवाय मुलाखत या तंत्रासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. यात सोईस्कर सहेतूक स्वयंनिर्वाचित आणि क्षेत्र नमुना निवड पध्दतीचा उपयोग करून तथ्य संकलन केले जाणार आहे.

तथ्य संकलनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व द्वितीयक तथ्य संकलनाच्या साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी अनुसूची, प्रश्नावली व मुलाखत या तंत्राचा गरजेनुसार वापर करण्यात येणार आहे. द्वितीयक तथ्य संकलनासाठी वैयक्तिक कागदपत्रे आणि सार्वजनिक कागदपत्रांचा तसेच प्रकाशित व अप्रकाशित दस्तावेज, ग्रंथ व नियतकालिकांचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्यांचे संकलन आणि वर्गिकरण :

संकलीत तथ्यांचे विश्लेषण आणि वर्गिकरण करण्यासाठी सारणी, आलेख, छायाचित्रे, विश्लेषण पध्दती यामध्ये गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण पध्दतीचा उपयोग करताना ऐतिहासिक, तुलनात्मक आणि वर्णनात्मक विश्लेषण पध्दतीचा उपयोग संशोधनात करण्यात येणार आहे .

प्रकरण योजना

प्रकरण पहिले

प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये जातीचा अर्थ, चर्मकार संज्ञेचा अर्थ, चर्मकार जातीची उत्पत्ती, चर्मकार जातीचा पूर्वइतिहास, चर्मकार जातीचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन धर्मसुधारक व समाजसुधारकांच्या विचारांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पध्दती

संशोधन पध्दती या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची निश्चिती, अध्ययन क्षेत्र, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाचे उद्देश, गृहितकृत्य, संशोधनाचे महत्त्व, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलनाची साधने, पूर्व संशोधनाचा व संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा इत्यादिची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

चर्मकार जातीची व्यावसायिक व आर्थिक स्थिती

तिसऱ्या प्रकरणामध्ये चर्मकार जातीची व्यावसायिक व आर्थिक स्थिती अभ्यासली जाणार आहे.

प्रकरण चौथे

चर्मकार जातीची शैक्षणिक स्थिती व महिलांचा दर्जा

चौथ्या प्रकरणामध्ये चर्मकार समाजामध्ये विविध समाज सुधारकांनी शिक्षणासाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न शिक्षणामुळे चर्मकार जातीतील महिलांचा दर्जा सुधारला आहे. याचा शोध घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे

आरक्षण, शासकीय योजना आणि चर्मकार जात

पाचव्या प्रकरणामध्ये आरक्षण व शासकीय योजनांच्या माध्यमातून चर्मकार जातीमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करण्यात येणार आहे .

प्रकरण सहावे

आधुनिकिकरण आणि चर्मकार जात

सहाव्या प्रकारणामध्ये आधुनिकीकरणाचा चर्मकार समाजावर झालेल्या परिवर्तनाचा व सद्यस्थितीचा शोध घेतला जाणार आहे.

प्रकरण सातवे

चर्मकार जातीच्या समस्या

सातव्या प्रकरणामध्ये चर्मकार जातीच्या सद्यस्थितीत निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्या व त्याचे परिणाम याचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण आठवे

निष्कर्ष आणि शिफारशी

आठव्या प्रकरणामध्ये चर्मकार समाजाच्या समस्या निर्मुलनासाठी व त्यांची प्रगती साधण्यासाठी कोणत्या उपाययोजना शासना मार्फत दिल्या गेल्या आहेत तसेच निष्कर्ष मांडून चर्मकार समाजाची प्रगती होण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागणार आहे याच्या शिफारशी या प्रकरणात केल्या जाणार आहेत.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा प्राथमिक असुन प्रत्यक्ष संशोधनात यात आवश्यक सर्व बदल करणे अपेक्षित आहेत.

प्रस्तुत संशोधन वर्तमानकालीन समाज जिवन समजुन घेण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरणार आहे .

– :: संदर्भ ग्रंथ : –

1 प्रा. डॉ. चांदेकर चंद्रशेखर, सामाजिक क्रांतीचे प्रणेते संत शिरोमणी गुरुरविदास समता प्रकाशन, नागपूर

2 चव्हाण रामनाथ नामदेव, जाती आणि जमाती मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे,

3 बांदीवडेकर / सहस्त्रबुध्दे (संपा) विश्व चर्मकाराचे, ग्रंथाली प्रकाशन मुंबई,

4 सौ. भामोरे निर्मला (संपा) संत गुरु रविदास डिरेक्टरी एक दिपस्तंभ, अंकुर प्रकाशन अकोला.

5 डॉ. लुलेकर प्रल्हाद जी, गाव गाड्याचे शिल्पकार स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

6 डॉ. भोसले, द. ता. संस्कृतीच्या पाऊलखुणा, पदमगंध प्रकाशन, पुणे ६०

7 अहुजा राम. भारतीय सामाजिक व्यवस्था, रावत पब्लिकेशन, जयपुर एवं दिल्ली

8 सुर्यवंशी क्र. गो.. राजर्षि शाहू राजा व माणूस डोकल प्रकाशन, पुणे

9 डॉ. कऱ्हाडे बी. एम., सामाजिक संशोधन पध्दती, पिंपळापुर ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स, नागपूर.

10 अहुजा राम, सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन जयपुर एवं नई दिल्ली.

11 सिंह देवेंद्र पाल, हिंदु अछुत जातीयों में छुआ छुत, कॉमनवेल्थ प्रकाशन, नई दिल्ली.

12 श्रीवास्तव रागीनी, आधुनिक समाज एवं महिलाएँ, ब्ल्यूस्टार प्रकाशन इंदौर

13 डॉ. राजकुमार, नारी के बदलते आयाम (संपा), अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली.

14 Ghurye G. S. , Caste and Race in India , Bombay Popular Prakashan

15 Kapoor , A.N. Guptav P Gupta Mohini , A Dictionary of scheduled castes in India . Radha Publication , New Delhi .

16 Goode Willam J and Paul K. Hatt , Methods in Social Research , Mcgraw hill International book Company

संशोधक

बब्रुवाहन प्रल्हाद पवार

(एम.ए., समाजशास्त्र सेट)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी. आर. मूट्ठे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, लातूर